MHST200015272020

**<u>वि.दि.दा.क्र.२३३/२०२३ मधील निशाणी क्र.६४ वरील आदेश</u>**

प्रतिवादीने सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, सदरचे प्रकरण वादी यांचा उलटतपास घेणेकामी दि.०५.०८.२०२६ रोजी नेमले होते. परंतु, सदर तारखेला प्रतिवादी हे त्यांच्या वैदयकीय महत्वाच्या कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने न्यायालयात हजर नव्हते. तसेच प्रतिवादी यांचे माहितगार वकील यांचे दुसऱ्या कोर्टात कामकाज असल्याने ते उपस्थित राहून नि.२१ वरील उलटतपास घेणे शक्य न झाल्याने न्यायालयाने दि.०७.०८.२०२६ रोजी प्रतिवादीविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. सदर दाव्याचे कामकाज गुणावगुणावर चालणेकामी सदरचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३. सदर अर्जावर वादीने म्हणणे देवुन अर्जातील मजकूर मान्य नसल्याने योग्य तो हुकूम करणेत यावा असे कथन केले आहे.

४. अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रतिवादीने अर्जाच्या पुष्ट्यर्थ नि.क्र.६५ वर शपथपत्र दाखल करुन नमुद केले की, वैदयकीय महत्वाच्या कामानिमित्त तो बाहेरगावी गेल्याने व त्याचे वकील दुसऱ्या कोर्टातील कामकाजात व्यस्त होते म्हणून नि.क्र.२१ वर उलटतपास घेवु शकले नाहीत. त्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत करणेत आला होता. सदर शपथेवरील म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ प्रतिवादीने कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र सादर केलेले दिसत नाही. तसेच प्रतिवादीचे वकील हे दुसऱ्या न्यायालयात व्यस्त होते हे कारण संयुक्तीक दिसत नाही. असे

असले तरी, सदर दावा हा रक्कम वसुल होवुन मिळणेकामी दाखल करण्यात आलेला दिसतो. उलटतपास ही प्रक्रिया सत्यपरिस्थिती पटलावर येण्यास मदत करते. त्यामुळे जर प्रतिवादीस उलटतपास करण्याची संधी दिली तर सत्यपरिस्थिती पटलावर येण्यास आणि वाद कायमस्वरुपी गुणतत्वावर निकाली काढण्यास मदत होईल. अन्यथा, प्रतिवादीचे आर्थिक नुकसान होऊ शकते. वादीच्या साक्षीदारास प्रतिवादीच्या चुकीमुळे पुन्हा न्यायालयात उलटतपासाकामी हजर राहणे भाग होत असल्यामुळे त्याकामी योग्य तो साक्षीभत्ता मंजूर केल्यास आणि प्रतिवादीस उलटतपास करण्याची संधी दिल्यास न्यायोचित होईल या मतास मी येवुन पुढील आदेश पारीत करत आहे :

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादीने वादीच्या साक्षीदारास साक्षीभत्ता रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे फक्त) दयावी.

३) वरील भत्त्याची पुर्तता झालेनंतर प्रतिवादीविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द झाला असे समजण्यात येईल.

SATISH BUGANNA GANAPA

Digitally signed by SATISH BUGANNA GANAPA
Date: 2026.08.12 17:37:09 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : १२/०८/२०२६

(एस. बी. गणपा)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.